navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 06 Jun, 2025 - 07 Jun, 2025

### Total Mention 35

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 10 | N/A | 2 | 8 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 3 | N/A | N/A | N/A | 3 |

| Online |
|---|
| 22 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | The Times of India | Shelar & Cong MP get into spat over Dharavi master plan | Mumbai | 8 |
| 2. | Hindustan Times | Marathi Manoos back in focus in Sena (UBT) poll bid | Mumbai | 6 |
| 3. | Loksatta | Thackeray group prepares for protest against Dharavi redevelopment | Mumbai | 4 |
| 4. | Navakal | Has Maharashtra given a mortgage to Adani Vadettiwar's question | Mumbai | 2 |
| 5. | Nav Rashtra | How much more land will be given to Adani | Mumbai | 2 |
| 6. | Sakal | Mumbaikars mocked for giving Kurla's land to Adani | Mumbai | 2 |
| 7. | Lokmat | BJP-Congress clash over Dharavi | Mumbai | 1,3 |
| 8. | Mumbai Tarun Bharat | Dharavikars, wake up! The master plan is for Dharavi development! | Mumbai | 8 |
| 9. | Punyanagari | Environmental damage in the state - Aditya Thackeray | Mumbai | 9 |
| 10. | Dophar Ka Samana | Now 64 plots of Municipal Corporation are also in Adani's bag! | Mumbai | 5 |

The Times of India • 06 Jun • Dharavi

Shelar & Cong MP get into spat over Dharavi master plan

| 8 • PG | 110 • Sqcm | 619812 • AVE | 2.74M • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# Shelar & Cong MP get into spat over Dharavi master plan

Times News Network

**Mumbai:** With Congress MP Varsha Gaikwad raising questions daily on the master plan approved by CM Devendra Fadnavis, BJP's Ashish Shelar, in reply, called Gaikwad for an "open discussion" on the Dharavi redevelopment project. He denied special benefits were given to the Adani Group, lead developer for the project. In a social media post, Gaikwad said she was ready for discussion and asked him to "inform the time and place" but set one condition — "that it happen in presence of Dharavikars."

Gaikwad asked how the master plan was being touted as implementation of the 2016 Dharavi Development Plan when the master plan was based on FSI and TDR policies decided in 2024. She accused govt of violating MRTP Act as the master plan was accepted by govt without inviting objections or suggestions.

Shelar, in a post on social media, said there is a difference between master plan and development plan. "The master plan specifies how much land is needed for rehabilitation, where it will take place, and what physical and social infrastructure is required for redevelopment of Dharavi, along with the necessary land. When the development plan is presented by DRPA, suggestions and objections will be invited from citizens as per MRTP Act," he said.

Hindustan Times • 06 Jun • Dharavi

Marathi Manoos back in focus in Sena (UBT) poll bid

| 6 • PG | 184 • Sqcm | 552153 • AVE | 1.1M • Cir | Top Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# Marathi Manoos back in focus in Sena (UBT) poll bid

**Saurabha Kulshreshtha**
swapnasaurabha.kulshreshtha@hindustantimes.com

**MUMBAI:** The Marathi manoos and attempts to reduce their importance in Mumbai is likely to be the main plank of the Shiv Sena (UBT) campaign strategy for the crucial BMC polls, likely to be held after the monsoon.

Given the recent Marathi-versus-Gujarati controversy and the government's attempt to make Hindi a compulsory third language in school curricula, the Shiv Sena (UBT) has planned to focus on its old 'Sons of the Soil' issue and the first right of the Marathi manoos over Mumbai in its poll campaign. Titled 'Ladha Aaplya Mumbaicha' (Battle for our Mumbai), the campaign, according to party insiders, will be led by its youth wing chief Aaditya Thackeray.




Titled 'Ladha Aaplya Mumbaicha' (Battle for our Mumbai), the campaign will be led by Aaditya Thackeray.

After the split in the party and losing power to the Eknath Shinde-BJP alliance, Sena (UBT) chief Uddhav Thackeray has been accusing the BJP and particularly prime minister Narendra Modi and union home minister Amit Shah of reducing the importance of Mumbai by shifting establishments out of the metropolis. Thackeray has also opposed the Dharavi Redevelopment Project (DRP) and alleged that Modi-Shah want to gift land across the city to the Adani group in the name of rehabilitation of Dharavi residents.

This strategy gave good results to the party, as it won three of the six Lok Sabha seats in Mumbai. Although it lost the assembly elections badly and could win only 20 seats, half of those were from Mumbai, which means the party is still a force in the city. The Thackeray father-son duo is now banking on goodwill from Marathi loyalists to win the BMC polls.

The party has decided to hold gatherings of its workers and various organisations to kick-start the campaign. As Mulund residents were the first to protest against the rehabilitation of Dharavi residents outside the slum pocket, the party will hold a gathering at Mulund to be addressed by Aaditya Thackeray. On Wednesday, Aaditya met people from Dharavi and assured them of support in their fight for proper rehabilitation.

A Shiv Sena leader said that Uddhav Thackeray had directed partymen on May 9 to raise their voice on local issues prior to the local body polls. "Accordingly, a campaign centred around the battle for Mumbai has been planned for the BMC elections," he said. "The DRP and land for rehabilitation granted to it across Mumbai will be centre-stage. Besides this, the corruption in the cement roads project, the poor condition of roads across the city, poor execution of drain cleaning, water logging in Mumbai and property tax will be key issues."

Anil Parab, who has played a key role in the Sena (UBT)'s campaigns, said that Uddhav Thackeray would sound the bugle for the BMC polls on June 19.

Loksatta • 07 Jun • Dharavi

## Thackeray group prepares for protest against Dharavi redevelopment

| 4 • PG | 77 • Sqcm | 300396 • AVE | 784.32K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावी पुनर्विकासाविरोधात ठाकरे गट आंदोलनाच्या तयारीत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या नावाखाली मुंबई लुटण्याचा डाव अदानी आणि सरकारने आखल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. हा डाव उधळून लावण्यासाठी धारावी पुनर्विकासाविरोधात लढा उभारण्याचा, आंदोलन करण्याचा निर्णय घेत आता ठाकरे गट मैदानात उतरला आहे. मुलुंड येथील कालिदास नाट्यगृहात सोमवारी, ९ जून रोजी सायंकाळी ६ वाजता ठाकरे गटाकडून एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी आमदार आदित्य ठाकरे नागरिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

धारावी पुनर्विकासाच्या नावाखाली मुंबईतील जमिनी लाटल्या जात असून या प्रकल्पात काय त्रुटी आहेत, या प्रकल्पाचा काय परिणाम होणार, यासंबंधीचे एक सादरीकरण ते यावेळी करणार आहेत. या सभेत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. मुलुंड, कुर्ला, कांजुरमार्ग, विक्रोळी, मालाड आणि धारावीसाठी जमिनीची मागणी करण्यात आलेल्या ठिकाणचे रहिवासी या सभेला उपस्थित राहणार असल्याची माहिती ठाकरे गटाचे ॲड. सागर देवरे यांनी दिली.

Navakal • 06 Jun • Dharavi

## Has Maharashtra given a mortgage to Adani Vadettiwar's question

| 2 • PG | 105 • Sqcm | 52461 • AVE | 273.62K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# महाराष्ट्र अदानींना गहाण दिला आहे का? वडेट्टीवारांचा सवाल

■ चंद्रपूर

**महायुती** सरकारने महाराष्ट्र आणि मुंबई अदानी समूहाला गहाण दिला आहे का, असा संतप्त सवाल काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारला उद्देशून केला.

मुंबईच्या कुर्ला येथील २१ एकर जागा अदानी उद्योग समूहाला राज्य सरकारने देण्याचा निर्णय घेतला . त्यासाठी अटी - शर्ती देखील शिथिल केल्या आहेत. याआधी मुंबईतील अनेक महत्त्वाचे भूखंड सरकारने अदानीच्या घशात घातले आहेत. आणखी किती जमीन आहात देणार आहात, सरकारने महाराष्ट्र आणि मुंबई अदानी समूहाला गहाण ठेवली आहे का,असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.

धारावी प्रकल्पासाठी अदानी समूहाला मुंबईतील जमीन खैरातीसारखी वाटण्यात येत आहे. धारावी पुनर्वसनाचे नाव पुढे करून मोक्याच्या जागा या उद्योग समूहाला



देण्याचे काम सरकार करत आहे. या मोक्याच्या ठिकाणी टॉवर उभे केले जाणार पण धारावीकरांसाठी जमीन दिल्याचे सरकार खोटे सांगत आहे. हे सरकार अदानी उद्योग समूहासाठी महाराष्ट्राला उद्‌ध्वस्त करत आहे,असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला.

Nav Rashtra • 06 Jun • Dharavi

## How much more land will be given to Adani

| 2 • PG | 37 • Sqcm | 60246 • AVE | 500.5K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# अदाणींना अजून किती जमीन देणार?

मुंबई, कुर्ला येथील २१ एकर जागा ही अदाणी उद्योगसमूहाला राज्य सरकारने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी अटी शर्ती देखील शिथिल केल्या आहेत. संपूर्ण मुंबईतील अनेक महत्त्वाचे भूखंड हे या समूहाला देण्यात आले आहेत. अजून किती जमीन यांना देणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्र आणि मुंबईचे अदाणी समूहाला गहाण ठेवली आहे का? असा सवाल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. मुंबईतील धारावी प्रकल्पासाठी अदाणी समूहाला मुंबईतील जमिनीची खैरात वाटण्यात येत आहे. धारावी पुनर्वसनाचे नाव पुढे करून मोक्याच्या जागा या उद्योग समूहाला देण्याचे काम सरकार करत आहे. या मोक्याच्या ठिकाणी टॉवर उभे केले जाणार पण धारावीकरांसाठी जमीन दिल्याचे सरकार सांगत आहे हे खोट आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. हे सरकार अदाणी उद्योग समूहासाठी महाराष्ट्राला उध्वस्त करत असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

Sakal • 06 Jun • Dharavi

## Mumbaikars mocked for giving Kurla's land to Adani

| 2 • PG | 52 • Sqcm | 34472 • AVE | 352.42K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

### 'कुर्ल्याची जमीन अदाणींना देणे मुंबईकरांची थट्टा'

मालाड (बातमीदार) : धारावीच्या पुनर्विकासासाठी कुर्ल्यातील डेअरीची जमीन देण्याचा निर्णय हा परवडणाऱ्या किमतीतील घरांच्या प्रतीक्षेत असलेल्या मुंबईकरांची थट्टा आहे, अशी टीका जनता दल सेक्युलर, निवारा अभियान मुंबई आणि मूलभूत अधिकार संघर्ष समितीने केला आहे. याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जनता दलाने काढले आहे. धारावीकरांच्या नावाखाली जमिनी उद्योगपती गौतम अदाणींना देण्याचा धडाका सरकारने लावला आहे. दरम्यान, आतापर्यंत झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी बाहेरची जमीन देण्याचा प्रकार नव्हता. जेथे झोपडपट्टी असेल तेथेच पुनर्वसन व विक्रीची घरे बांधत होते. धारावीकरांबाबत मात्र सर्वच अपवाद केला जात आहे. सरकारचे हे धारावी प्रेम आहे की अदानी, असा सवाल जनता दलाने केला आहे. जनता दलाचे अध्यक्ष प्रभाकर नारकर, प्रदेश सचिव संजय परब, मुंबईचे युवा अध्यक्ष केतन कदम, संजीवकुमार सदानंद, मूलभूत अधिकार संघर्ष समितीचे दिनेश राणे आदींनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

Lokmat • 06 Jun • Dharavi

## BJP-Congress clash over Dharavi

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1,3 • PG | 237 • Sqcm | 237070 • AVE | 604.7K • Cir | Middle Left,Top Left |

Mumbai

# भाजप- काँग्रेसमध्ये धारावीवर 'तू तू मै मै'

**मुंबई :** मुंबई भाजप आणि काँग्रेस अध्यक्षांमध्ये धारावी पुनर्वसन विषयांवरून आरोप-प्रत्यारोप करण्यात येत आहेत. मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी एकाही धारावीकराला बेघर केले जाणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिल्याचे स्पष्ट केले. मविआच्या काळात अपात्र ठरवलेल्या नागरिकांनाही आताच्या प्रक्रियेत समाविष्ट केले जाणार आहे, असेही शेलार म्हणाले. - वृत्त/३

# भाजपा- काँग्रेसमध्ये धारावीवर 'तू तू मै मै'

## अफवा पसरवण्याचे षडयंत्र : आशिष शेलार; जनतेच्या प्रश्नांची उत्तरे द्या : खा. वर्षा गायकवाड

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणूक अद्याप जाहीर झालेली नाही. मात्र, भाजपा आणि काँग्रेस आत्तापासूनच प्रचाराला लागल्याचे चित्र दिसत आहे. मुंबई भाजपा आणि काँग्रेस अध्यक्षांमध्ये धारावी पुनर्वसन विषयांवरून 'तू तू मै मै' सुरू झाली असून, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात येत आहेत.

मुंबई भाजपा अध्यक्ष आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी एकाही धारावीकराला बेघर केले जाणार नाही आणि तशी ग्वाही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिल्याचे स्पष्ट केले. महाविकास आघाडीच्या काळात अपात्र ठरवलेल्या नागरिकांनाही आताच्या प्रक्रियेत समाविष्ट केले जाणार आहे, असे सांगत शेलार यांनी स्थानिक आमदार, खासदारांनी राजकीय स्वार्थासाठी लाखो धारावीकरांच्या भवितव्याशी खेळ सुरू केला आहे आणि अपप्रचार करून प्रकल्पात अडथळे आणले जात आहेत, असा आरोप केला.

शेलार यांनी म्हटले की, काँग्रेस सरकारच्या काळात केवळ आश्वासने दिली गेली आणि प्रकल्प रखडवला. सरकारने मास्टर प्लॅन तयार केल्यानंतर आता त्याविषयी अफवा, गैरसमज पसरवण्याचे षडयंत्र सुरू झाले आहे.




### 'मुंबई व महाराष्ट्राला लुटण्याचे काम सुरू आहे'

**१** या टीकेला प्रत्युत्तर देताना मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड यांनी शेलार यांच्यावर थेट घणाघात केला. शेलार आणि त्यांचे सरकार केवळ कोणाचे एजंट बनून काम करत आहेत, हे जनता चांगलं जाणते. 'गरीब हटाओ, धारावी मिटाओ, अदानी सिटी बनाओ' हाच त्यांचा अजेंडा आहे. आम्ही धारावी व मुंबईच्या न्याय-हक्कांची लढाई लढत आहोत आणि ते अदानीचे खिसे भरण्यासाठी मुंबई व महाराष्ट्राला लुटत आहेत.

**२** माझं त्यांना ओपन चॅलेंज आहे, विषयांना बगल देऊ नका. जनतेच्या प्रश्नांची उत्तरं द्या, असे आव्हान खा. गायकवाड यांनी दिले. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या राज्य शासनाने मंजूर केलेल्या मास्टर प्लॅनवर तसेच धारावीतील एफएसआय, टीडीआर, झोपडीधारकांचे सर्वेक्षण यावर त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

Mumbai Tarun Bharat • 06 Jun • Dharavi

# Dharavikars, wake up! The master plan is for Dharavi development!



| 8 • PG | 387 • Sqcm | 48404 • AVE | 17.73K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावीकर, जागा हो! 'मास्टर प्लॅन' धारावी विकासाचाच!



**'धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी)' हा धारावीकरांचे जीवनमान व उपजीविका यांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणारा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प. दर्जेदार पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सेवा यांच्या माध्यमातून धारावीकरांचे राहणीमान उंचावण्याचे उद्दिष्ट या प्रकल्पात निर्धारित करण्यात आले आहे. तसेच धारावीच्या वैशिष्ट्यांना जपत, सर्वांगीण विकासाच्या माध्यमातून मुंबईला एक नवे, जागतिक दर्जाचे आणि आधुनिक सुविधांनी युक्त असे शहर म्हणून घडविण्याची पूर्ण क्षमतादेखील या प्रकल्पात आहे. पण, केवळ राजकीय स्वार्थासाठी या प्रकल्पाविषयी अपप्रचार सुरु दिसतो. ही बाब लक्षात घेता, नेमका धारावी प्रकल्पाचा 'मास्टर प्लॅन' आहे तरी काय, याचे सोप्या शब्दांत विवेचन करणारा हा लेख...**



विकासगाथा
गायत्री श्रीगोंदेकर

धारावीकरांच्या स्वप्नातील नव्या घरापासून ते सार्वजनिक वापराच्या जागांपर्यंत सर्वसमावेशक अशा धारावी पुनर्विकासाच्या 'मास्टर प्लॅन'ला राज्य सरकारने नुकतीच मंजुरी दिली. निवासी जागा, उद्याने, शाळा, आरोग्य सुविधा, मेट्रो, मोठाले रस्ते यांसह धारावीकरांचे राहणीमानही उंचावणारा असा हा आराखडा राज्य सरकारने मंजूर केला आहे. मात्र, तरीही धारावीकरांचे पक्क्या घराचे स्वप्न साकारून त्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या या प्रकल्पाच्या 'मास्टर प्लॅन' विरोधात काँग्रेससह महाविकास आघाडीतील पक्ष धारावीकरांमध्ये संभ्रम निर्माण करताना दिसतात. इतकेच नाही, तर या आराखड्याबाबत धारावीकरांची दिशाभूल करण्याचे एक पद्धतशीर षड्यंत्रदेखील विरोधी पक्षांनी चालवलेले दिसते. अशावेळी धारावी पुनर्विकासाचा आराखडा धारावीकरांना सोप्या शब्दांत सांगण्याची आवश्यकता निर्माण होते.

हा पुनर्विकास आराखडा प्रामुख्याने तीन तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवून आखण्यात आला आहे. यामध्ये पुनर्विकासाच्या माध्यमातून आर्थिक परिवर्तन, सशक्त पर्यावरण व पायाभूत रचना, सर्वसमावेशक विकासातून धारावीला मुख्य प्रवाहात आणणे, यातूनच धारावीत आर्थिक परिवर्तन घडवून आणणे, मोठ्या उद्यानांपासून ते लहान सामुदायिक क्रीडांगणांपर्यंत हरित आणि सार्वजनिक जागांचे एकमेकांशी जोडलेल्या नेटवर्कच्या माध्यमातून प्रत्येक रहिवाशाला चैतन्यशील राहणीमान प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे. धारावीत नव्याने निर्माण होणारे हरित पट्टे धारावीतील पर्यावरणीय शाश्वतता देखील मजबूत करतील आणि दैनंदिन जीवनाची गुणवत्ताही वाढवण्यास हातभार लावतील.

**विकास आराखड्याची मुख्य वैशिष्ट्ये**

**मोकळ्या जागांची जोडणी :** मोठ्या शहर उद्यानांपासून ते छोट्या गल्लीतील मैदानांपर्यंत एकत्रित व सुसंगत सार्वजनिक व हरित जागा धारावीत उपलब्ध करून देण्यात येतील, जिथे पादचारी मुक्तपणे चालू शकतील. यामुळे शहरात पर्यावरणीय संतुलन राखले जाईल व नागरिकांचे जीवनमानही उंचावेल.

**सेंट्रल पार्क :** धारावीच्या मध्यभागी एक मोठी खुली जागा तयार केली जाईल, जी केवळ धारावीकरांसाठीच नव्हे, तर संपूर्ण मुंबईसाठी सण-समारंभ, कार्यक्रम यांसाठी खुली असेल.

**चालण्यायोग्य व वाहतूक केंद्रित विकास :** धारावीमध्ये बहुस्तरीय वाहतूक सुविधा उभारण्यात येणार आहेत. नवीन मेट्रो मार्ग, बस फीडर सेवा, सायकल व पादचारी मार्ग, लहान रस्ते एकमेकांशी जोडले जातील, अशी रस्ते संरचना यामुळे नागरिकांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचणे शक्य होईल.



**बहुपर्यायी वाहतूक केंद्र-मल्टीमॉडेल ट्रान्झिट हब (MMTH) :** धारावीच्या मध्यभागी अशा प्रकारचा पहिलाच ट्रान्झिट हब उभारण्यात येईल, जिथे आंतरशहर, अंतर्गत शहर, उपनगरी रेल्वे, मेट्रो, हाय-स्पीड रेल्वे, विमानतळ एक्सप्रेस, बस व अन्य वाहतूक सेवा एकत्रित असतील. प्रवासी येथे आपले सामान तपासणीसाठी ठेवून, या केंद्रातील विविध सुविधा उपभोगू शकतील.

**या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधा :**

- २४७ पिकअप/ड्रॉप/किरकोळ सेवा
- उपहारगृहे, कॅफे व खरेदीसाठी सुविधा
- कार्यालय व हॉटेल स्पेस
- सेंट्रल अव्हेन्यूशी थेट संपर्क

**सुलभ सामाजिक सुविधा :** शाळा, आरोग्यसेवा व समुदाय केंद्रे अशा सुविधा अगदी हाकेच्या अंतरावर असतील (५-१५ मिनिटे). प्रत्येक वसाहतीत सामाजिक व वाहतूक सुविधा जोडून स्वयंपूर्ण केंद्र विकसित केले जाईल.

**आधुनिक आरोग्य सुविधा :** धारावी व महानगर परिसरात अत्याधुनिक रुग्णालये, पॉलिक्लिनिक्स, प्राथमिक उपचार केंद्रे व निदान केंद्रे उभारण्यात येतील, ज्यामुळे मध्य मुंबईतील वैद्यकीय पायाभूत सुविधा अधिक सशक्त होतील.

**वसाहतींची निर्मिती :** रहिवासी, व्यावसायिक व शैक्षणिक संकुले चालण्यायोग्य अंतरावर उभारली जातील, ज्यामुळे धारावीकरांच्या वेळ आणि पैशाची बचत होईल.

**राहणी आणि उपजीविका एकत्र:** उद्योगधंद्यांसाठी योग्य, स्वच्छ व बांधकामदृष्ट्या मजबूत जागा धारावीत उद्योजकांना प्रदान केल्या जातील. पात्र उद्योगांना व अपात्र युनिट्सना वाणिज्यिक जागा भाड्याने घेण्याचा पर्यायदेखील दिला जाईल. यामुळे धारावीचे अनोखे 'लिव्ह-वर्क' संस्कृती टिकून राहील.

**क्लस्टर विकास-सामूहिक विकास :** प्रत्येक सामूहिक प्रकल्पांमध्ये सार्वजनिक स्थळे उपलब्ध असतील. बालकांसाठी सुरक्षित खेळाच्या जागा व क्रीडा उपकरणेही उपलब्ध असतील.

**नदीकाठ व जलाशय पुनरुज्जीवन :** मिठी नदीच्या काठाशी एक सुंदर 'धारावी प्रोमनेड' तयार केला जाईल; जो शहरातील दुसरा सर्वांत मोठा 'वॉकवे' असेल (मरीन ड्राईव्हनंतर). ही जागा सर्व वयोगटांसाठी सामाजिक व विरंगुळ्याचे केंद्रबिंदू बनेल. या पुनर्विकास योजनेचा मुख्य उद्देश सर्व रहिवाशांच्या विशेषतः लहान मुलांच्या गरजांना प्राधान्य देणारा एक स्वयंपूर्ण विकास समूह तयार करणे आहे. लहान मुलांच्या वाढीसाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करून दर्जेदार क्रीडा सुविधा आणि क्रीडासाहित्य प्रदान केले जाईल. मिठी नदीच्या काठावर आणि उत्तरेला खारफुटीच्या जंगलात फिरण्याचा आनंद घेण्यासाठी हा विहार मार्ग एक सुंदर ठिकाण म्हणून नक्कीच धारावीकरांच्या पसंतीस उतरेल. तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीही हे एक आकर्षक विरंगुळा असेल. 'क्वीन्स नेकलेस' (मरीन ड्राईव्ह) नंतर हे ठिकाण शहरातील सर्वांत लांब 'वॉटरफ्रंट' म्हणून ओळखले जाईल.

**प्रस्तावित रस्त्यांचे जाळे :** सुमारे २१ किमी लांबीचे नवीन व रुंदीकरण केलेले रस्ते (नऊ मीटर ते ३६ मीटर रुंद) धारावीच्या पुनर्विकासानंतर तयार होतील. प्रस्तावित रस्त्यांच्या नेटवर्कमध्ये नऊ मीटर, १२ मीटर, १५ मीटर, १८ मीटर, २१ मीटर, २४ मीटर, २७ मीटर आणि ३६ मीटर रस्त्यांचा समावेश असेल. दर १२५ मीटर अंतरावर एक जोडरस्ता असेल, जो विविध वसाहतींना एकमेकांशी जोडेल व मुख्य रस्त्यांवरील ताण कमी करेल. धारावीसाठी सुसज्ज रस्ते, सार्वजनिक जागांवर सहज प्रवेश असेल, ज्यामुळे परिसर अधिक सुरक्षित, सुसंगत वाटेल.

**ग्रीन स्पाईन :** माहीम निसर्ग उद्यानापासून रेल्वे भागापर्यंत एका हिरवळीत समृद्ध 'ग्रीन स्पाईन' तयार केला जाईल. यात सेंट्रल बायोस्वेलचा समावेश असेल, जे पूर व्यवस्थापनासाठी उपयोगी ठरेल.

**धार्मिक स्थळे :** सर्व धर्मीयांसाठी जागतिक दर्जाची धार्मिक संकुलेही धारावीत उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक नागरिकाला आपल्या निवासस्थानाजवळ श्रद्धा व उपासनेसाठी एक प्रशस्त धार्मिक स्थळ उपलब्ध होईल.

## धारावीत कोणासाठी किती सदनिका?




### धारावी पुनर्विकास प्रकल्प दृष्टिक्षेपात...

| | |
|---|---|
| धारावी अधिसूचित क्षेत्र : | २५३ हेक्टर |
| प्रकल्प मंजुरी (LOA) : | दि. १७ जुलै २०२३ |
| प्रत्यक्ष कामाला सुरुवात (CC): | दि. १४ जानेवारी २०२५ |
| प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी : | दि. १३ जानेवारी २०३२ (सात वर्षे) |
| प्रकल्पाची अंदाजित किंमत : | ९५ हजार, ७९० कोटी |
| प्रकल्पाची सद्यस्थिती : | बांधकामास सुरुवात |
| आर्थिक प्रगती : | ४ हजार, ५६३ कोटींची गुंतवणूक |

### लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून धारावी प्रकल्प

| | |
|---|---|
| पुनर्वसन-नूतनीकरण लोकसंख्या | २,९२,६६० |
| विक्री लोकसंख्या | १,०६,८९२ |
| वगळलेल्या मालमत्ता लोकसंख्या | ५१,०२५ |
| इतर विकसित खासगी मालमत्ता | १५,००० |
| रेल्वे क्वार्टर युनिट्स | ३,७११ |
| एकूण | ४,६९,२८८ |
| अपेक्षित लोकसंख्या वाढ | १६,४२५ |
| एकूण लोकसंख्या | ४,८५,७१३ |

Punyanagari • 06 Jun • Dharavi

Environmental damage in the state - Aditya Thackeray

| 9 • PG | 125 • Sqcm | 68548 • AVE | 72.24K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# राज्यात पर्यावरणाची हानी – आदित्य ठाकरे

मुंबई : राज्यात एकीकडे पर्यावरणाच्या हानी होत असताना सरकार प्रसार माध्यमातून जागरूक असल्याचा दिखावा करत असल्याची टीका शिवसेना (ठाकरे) नेते, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी केली. पर्यावरणाची कशाप्रकारे हानी केली जाते, याची यादीच त्यांनी वाचून दाखवली आहे.



जागतिक पर्यावरण दिनी राज्य सरकार आणि प्रदूषण महामंडळ विविध कार्यक्रम राबवते. परंतु पर्यावरण संबंधित जी संकटे ओढवली आहेत, त्याबाबत सरकारला प्रश्न विचारण्याची कोणामध्ये हिंमत नाही. सरकार त्यामुळे इव्हेंटबाजी करून मोकळे होते. मुंबईसाठी तयार केलेला क्लायमेट प्लान जवळपास कचऱ्याच्या टोपलीत गेला आहे. झाडांची कत्तल होत आहे. धारावीतील नॅचरल पार्क पुनर्विकास प्रकल्पामध्ये टाकला आहे. वनांवर बुलडोझर चालवला जात आहे. जंगल उद्ध्वस्त केले जात आहेत. पर्यावरण वाचवा, माझी वसुंधरा योजना मागे पडल्याचे सांगत सरकारच्या कारभारावर आदित्य यांनी निशाणा साधला.

Dophar Ka Samana • 06 Jun • Dharavi

## Now 64 plots of Municipal Corporation are also in Adani's bag!

| 5 • PG | 165 • Sqcm | 27162 • AVE | 198.08K • Cir | Bottom Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# अब मनपा के 64 भूखंड भी अडानी की झोली में!

**● पुनर्विकास में मिलेगी तरजीह ● जून के अंत तक जारी होगा टेंडर**



सामना संवाददाता / मुंबई

कुर्ला में मदर डेयरी का ८.५ एकड़ भूखंड अडानी को दिया गया है, वहीं अब मुंबई महानगरपालिका के ६४ भूखंडों पर झोपड़पट्टियों के पुनर्विकास में अडानी समूह को तरजीह मिलने की संभावना है। सरकार पहले ही धारावी पुनर्विकास के नाम पर मुंबई महानगरपालिका के छह भूखंड अडानी को देने का प्रस्ताव कर चुकी है। अब संभावना जताई जा रही है कि अडानी को ६४ भूखंड पुनर्विकास के लिए मिल जाएंगे। इस बीच इस पुनर्विकास के लिए जून के अंत तक निविदाएं जारी कर दी जाएंगी।

अपने स्वामित्ववाले ६४ भूखंडों पर झोपड़पट्टियों का पुनर्विकास खुद मुंबई महानगरपालिका करने जा रही थी, लेकिन अब महानगरपालिका ने इन ६४ एसआरए योजनाओं को बड़ी निर्माण कंपनियों की मर्जी से बांटने का फैसला किया है और ये पुनर्विकास परियोजनाएं २५ प्रतिशत से अधिक प्रीमियम देनेवाले डेवलपर्स को दी जाएंगी। हालांकि, अडानी समेत बड़े डेवलपर्स ने ६४ प्लॉटों के पुनर्विकास में रुचि दिखाई है, इसलिए विपक्ष ने आरोप लगाया है कि यह सारा प्लान अडानी को इन प्लॉटों पर जबरन कब्जा देने की एक चाल है।

### विशेष प्रकोष्ठ स्थापित

मुंबई महानगरपालिका ने अपने स्वामित्ववाले ६४ प्लॉटों पर झोपड़पट्टियों के पुनर्विकास के समन्वय के लिए एक विशेष प्रकोष्ठ का गठन किया है। इस प्रकोष्ठ के लिए छह महानगरपालिका अधिकारी और कर्मचारी नियुक्त किए गए हैं और पुनर्विकास के संबंध में आगे की कार्रवाई उनके माध्यम से की जाएगी।

### ४० से अधिक डेवलपर्स इच्छुक

मुंबई महानगरपालिका के ६४ प्लॉटों पर झोपड़पट्टियों का पुनर्विकास महानगरपालिका द्वारा किया जाना था। इसके लिए महानगरपालिका ने म्हाडा से अनुरोध किया था, लेकिन म्हाडा ने इसमें कोई रुचि नहीं दिखाई इसलिए अंत में इसके लिए खुले तौर पर निविदाएं आमंत्रित की जाएंगी। इस निविदा प्रक्रिया में अडानी रियल्टी, वाधवा ग्रुप, रुस्तमजी जैसे ४० बड़े डेवलपर्स ने रुचि दिखाई है।

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **3** | **ABP Majha (3)** |

1. ABP Majha 3

**ABP Majha**
**Dharavi**




Thackeray's Sena to hold meeting on Monday against Dharavi redevelopment.

7 Chya 70 Batmya • Marathi • 08:04 AM 07 Jun, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Thackeray's Sena to hold meeting on Monday against Dharavi redevelopment.

7 Chya 70 Batmya • Marathi • 07:03 AM 07 Jun, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Thackeray's Sena to hold meeting on Monday against Dharavi redevelopment.

100 Headlines • Marathi • 06:03 AM 07 Jun, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Msn India | We will break barrier of 50 pc cap on quotas: Rahul Gandhi in Bihar | 733.9M |
| 2. | Hindustan Times | Marathi Manoos to be centre-stage once more in Sena (UBT) BMC poll campaign | 124.6M |
| 3. | Lokmat | धारावी पुनर्वसन: भाजपाचे आशिष शेलार अन् काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांच्यात 'तू ... | 42.3M |
| 4. | Loksatta - Marathi Newspaper | धारावी पुनर्विकासा विरोधात ठाकरे गट मैदानात; मुलुंडमध्ये सोमवारी सभा, आंदोलनाची ... | 33.4M |
| 5. | The Economic Times | We will break barrier of 50 pc cap on quotas: Rahul Gandhi in Bihar | 28.7M |
| 6. | Outlook India | Maharashtra Cabinet Approves Revised Terms For Mother Dairy Plot In Dharavi Rede... | 22.1M |
| 7. | ThePrint | We will break barrier of 50 pc cap on quotas: Rahul Gandhi in Bihar | 11.3M |
| 8. | Etvbharat | Centre Won''t Conduct Caste Census Properly, Says Rahul Gandhi | 11.2M |
| 9. | Business Standard | We will break barrier of 50 pc cap on quotas: Rahul Gandhi in Bihar | 8.1M |
| 10. | IBC24 News | हम आरक्षण पर 50 प्रतिशत की सीमा को हटायेंगे: राहुल गांधी | 7.3M |
| 11. | The Telegraph India | Rahul needles Modi with 'surrender'' barb, cites Trump''s claim on Pakistan truc... | 6.6M |
| 12. | ThePrint | हम आरक्षण पर 50 प्रतिशत की सीमा को हटायेंगे: राहुल गांधी | 483.1K |
| 13. | News Drum | We will break barrier of 50 pc cap on quotas: Rahul Gandhi in Bihar | 158.4K |
| 14. | Ht Syndication | Marathi Manoos back in focus in Sena (UBT) poll bid | 119.8K |
| 15. | Ht Syndication | Marathi Manoos back in focus in Sena (UBT) poll bid | 119.8K |
| 16. | The Raisina Hills | Rahul Gandhi in Bihar Forays into Nitish Kumar Vote Base | N/A |
| 17. | Daily World Hindi | हम आरक्षण पर 50 प्रतिशत की सीमा को हटायेंगे: राहुल गांधी | N/A |
| 18. | उद्योग का अनुमान | हम आरक्षण पर 50 प्रतिशत की सीमा को हटायेंगे: राहुल गांधी | N/A |
| 19. | The Sen Times | We will break barrier of 50 pc cap on quotas: Rahul Gandhi in Bihar | N/A |
| 20. | BharatKi Baat | Rahul Gandhi pledges to eliminate 50% quota cap during Bihar visit. | N/A |
| 21. | Construction World | Serentica Secures $100M Loan for 300 MW Rajasthan Solar Project | N/A |
| 22. | Construction World | Maharashtra Clears Kurla Plot Transfer for Dharavi Redevelopment | N/A |